## उच्च व सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकांची जून २०१६ ची स्थिती

| याचिका क्रमांक | याचिका कर्ते | दाखल दि. | निकाल दि. | न्यायालय | निकाल |
|---|---|---|---|---|---|
| अ. कुंठित वेतनवाढ वसुली | | | | | |
| 1: 9054/ 2010 | 58 | 06.09.2010 | 22.08.2011 | उच्च न्यायालय | |
| 2: 2868/ 2011 | 15 | 22.03.2011 | 22.08.2011 | उच्च न्यायालय | |
| 3: 7838/ 2011 | 75 | 27.09.2011 | 04.07.2012 | उच्च न्यायालय | |
| 4: 9304/ 2011 | 65 | 25.11.2011 | 01.02.2012 | उच्च न्यायालय | |
| 5: 6516/ 2012 | 94 | 01.08.2011 | 01.10.2013 | उच्च न्यायालय | |
| 6: 5358/ 2012 | 83 | 21.06.2013 | 01.10.2013 | उच्च न्यायालय | |
| 7: 3142/ 2014 | 79 | 01.04.2014 | 25-02-2015 | उच्च न्यायालय | |
| 8: 8294/ 2015 | 50 | 04-08-2015 | 07-06-2016 | उच्च न्यायालय | |
| ब. ग्रॅच्युईटी: ६ व्या वेतन आयोगात ऑगस्ट २००९ पूर्वीच्या सेवा निवृत्तांना रू ७ लाख मिळण्यासाठी | | | | | |
| 9: 5284/ 2011 | 129 | 10.06.2011 | 26.09.2011 | उच्च न्यायालय | |
| 10: 3700/ 2012 | 129 | 05.12.2011 | 30.01.2013 | सर्वोच्च न्यायालय | |
| 11: 5206/ 2014 | 333 | 08.04.2014 | 06-04-2016 | उच्च न्यायालय | |
| क. पीएच.डी.वेतनवाढी: क्र. १२,१३: १जाने.१९९६ पासून २ आणि क्र.१४ -जाने-१९८६ पूर्वी ३ वेतनवाढी | | | | | |
| 12: 10431/ 2012 | 101 | 19.10.2012 | 15.07.2014 | उच्च न्यायालय | |
| 13: 966/ 2016 | 36 | 27.10.2015 | 18.03.2016 | उच्च न्यायालय | |
| 14: 10215/ 2014 | 25 | 11.10.2012 | 27.11.2014 | उच्च न्यायालय | |
| ड. सेवा निवृत्त वेतन सुधारणा: क.१५. ४था आयोग क्र.१६,१७,१८, ५वा आयोग क्र. १९- ६वा आयोग | | | | | |
| 15: 5204/ 2014 | 45 | 16.04.2014 | 00 | उच्च न्यायालय | |
| 16: 4292/ 2013 | 325 | 01.04.2014 | 25.02.2015 | उच्च न्यायालय | |
| 17: 4554/ 2016 | 325 | 15.04.2016 | 00 | उच्च न्यायालय | |
| 18: 5042/ 2016 | 526 | 28.04.2016 | 00 | उच्च न्यायालय | |
| 19: 4731/2014 | 155 | 09.06.2014 | 27.11.2014 | उच्च न्यायालय | |
| इ. अवमान याचिका | | | | | |
| 20: 518/ 2011 | कुंठित वेतनवाढ याचिका क्र. 9054/2010 करीता | | | सर्वोच्च न्यायालय | |
| 21: 519/ 2011 | कुंठित वेतनवाढ याचिका क्र. 2868/2011 करीता | | | सर्वोच्च न्यायालय | |
| 22: 484/ 2012 | कुंठित वेतनवाढ याचिका क्र. 9304/2011 करीता | | | उच्च न्यायालय | |
| 23: 518/ 2012 | कुंठित वेतनवाढ याचिका क्र. 7838/2011 करीता | | | उच्च न्यायालय | |
| 24: 39/ 2014 | कुंठित वेतनवाढ याचिका क्र. 6516/2012 करीता | | | उच्च न्यायालय | |
| 25: 545/ 2014 | कुंठित वेतनवाढ याचिका क्र. 3142/2014 करीता | | | उच्च न्यायालय | |
| 26: 307/ 2014 | ग्रॅच्युईटी रू. ७ लाख याचिका क. 3700/2012 करीता | | | सर्वोच्च न्यायालय | |
| 27: 277/ 2014 | ग्रॅच्युईटी रू. ७ लाख याचिका क. 3700/2012 करीता | | | सर्वोच्च न्यायालय | |
| 28: 545/2014 | पीएच.डी २ वेतनवाढी 10431/ 2012 करीता | | | उच्च न्यायालय | |
| 29: 56/ 2016 | पीएच.डी २ वेतनवाढी 10431/2012 करीता | | | उच्च न्यायालय | |

## केंद्रीय कार्यकारिणी

**प्राचार्य डॉ.एम.ए.वाहूळ** (औरंगाबाद)
अध्यक्ष, मो. ९८८१७७०९९५
'अत्तदीप' २०, सावरकरनगर, एन-५, दक्षिण सिडको, औरंगाबाद-०३

**प्राचार्य डॉ.जे.एम. मंत्री** (हिंगोली)
उपाध्यक्ष, मो. ९७३००२४२४५
'जिव्हाळा' ३२, वसुंधरा कॉलनी, एन-७, सिडको, औरंगाबाद-०३.

**प्राचार्य मुहम्मद शफी** (औरंगाबाद)
सचिव, मो. ९८५००२९३८४
८, प्रोफेसर कॉलनी, हिमायतबागे समोर, औरंगाबाद-०१.

**प्राचार्य आर.डी.राणे** (जळगांव)
सहसचिव, मो. ९४२२७७३६३२
८-ब, शिवराम नगर, जिल्हापेठ, जळगांव-०२.

**प्रा.एस.बी.नाफडे** (औरंगाबाद)
कोषाध्यक्ष, मो. ९४२३७८१७४५
'निंबस' १३, एकता कॉलनी, हिमायतबागे समोर, औरंगाबाद-०१.

**प्रा.डॉ.एम.डी.जहागीरदार** (औरंगाबाद)
सदस्य, मो. ९४२२२१०७२७
एच-२७, एन-४, सिडको, औरंगाबाद-०३.

**प्राचार्य डॉ. मानसिंग के.जगताप** (कोल्हापूर)
सदस्य, मो. ९४२२४२५६६५
सम्राट सोसायटी ब ५, ८ वी गल्ली, राजारामपुरी, कोल्हापुर-०८.

**डॉ.एम.जी.गायकवाड** (नाशिक)
सदस्य, मो. ९८९०९७७६१०
२,'दशरथ अपार्टमेंट',न्यु.पंडीत कॉलनी, एन.एम.सी.मागे,नाशिक-१.

**प्राचार्य डॉ.जे.बी.चौगुले** (सांगली)
सदस्य, मो. ९९२३२५८२२२
श्रीपार्श्व, शारदानगर, कुपवाडरोड, सांगली-०६.

**प्रा.डॉ.व्हि.डी.देशपांडे** (नांदेड)
सदस्य, मो. ९०११९४५३१०
८४-ब, 'स्पप्नदीप', यशवंतनगर, नांदेड-०२.

**प्रा.डॉ.ए.डब्ल्यु.राऊत** (अमरावती)
सदस्य, मो. ९४२०८३३३९९
अमिन कँपस, हाजीरोड, कँप, अमरावती-०४.


◆ प्रकाशक ◆
सचिव
असोसिएशन ऑफ कॉलेज अॅन्ड युनिव्हर्सिटी
सुपर अॅन्युएटेड टीचर्स (महाराष्ट्र)
वसुंधरा कॉलनी, एन-७, सिडको, औरंगाबाद-४३१००३
जून २०१६


# असोसिएशन ऑफ कॉलेज अॅन्ड युनिव्हर्सिटी सुपर अॅन्युएटेड टीचर्स (महाराष्ट्र)

रजि.नं.महा.८५३/२००९-एफ-१५२७६


'अत्तदीप'
२०, सावरकर नगर,एन-५ दक्षिण, सिडको,
औरंगाबाद (महाराष्ट्र) - ४३१००३
फोन : ०२४० - २४८१७१६
website: acusat.org.in

## १ भूमिका

महाविद्यालय वा विद्यापीठातुन सेवानिवृत्त झाल्यावर निश्चित सुत्रानुसार शिक्षकांना निवृत्ती वेतन मिळते, मग संघटनेची आवश्यकता काय? असा अनेकांचा प्रश्न होता. या पार्श्वभुमीवर राज्यातील सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या ''असोसियशन ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर अॅन्युएटेड टीचर्स'' या संघटनेची मुहुर्तमेढ दि. २७ नोव्हेंबर २००९ ला औरंगाबाद येथे रोवल्या गेली आणि आज या संघटनेची उपयुक्तता स्वयंसिध्द आहे. राज्यात सेवेत असलेल्या शिक्षकांच्या प्रबळ संघटना पुर्वीपासून कार्यरत आहेत. तथापी महाविद्यालये आणि विद्यापीठातील सेवानिवृत्त शिक्षकांना त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी एकही सक्षम माध्यम उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्यांची मोठी कुचंबना होत होती.

कोणताही समाज घटक अथवा समुह आपल्या ध्येयासाठी सनदशीर मार्गाने एकत्र येऊन कार्यरत असेल तर त्या समुहाची प्रगती अपेक्षित दिशेने आणि गतीने निश्चित होत असते. परंतु त्यासाठी हवे असते Dedication Devotion आणि Determinatio ! कैंद्रीय कार्यकारिणी, सर्व विद्यापीठाच्या विभागीय कार्यकारिणींचे पदाधिकारी आणि राज्यभरातील असंख्य उत्साही सहकारी यांनी ही त्रिसुत्री आत्मसात केल्यामुळे अल्पावधित संघटनेचा विस्तार राज्यभरात झाला आहे.

सेवेत असेलल्या आणि सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचे प्रश्न अगदी भिन्न असतात. मानव संसाधन विकास मंत्रालय व विद्यापीठ अनुदान आयोग सेवा निवृत्ती वेतनासाठी सुत्र ठरवुन देते. तसेच यासंदर्भात राज्य शासनाचेही कांही आदेश असतात. मात्र अंमलबजावणी करताना यात जाणते वा अजाणतेपणे राज्य शासनाकडून कांही त्रुटी राहुन जातात. उदा. ५ व्या व ६ व्या आयोगात युजीसी ने स्विकारलेले निवृत्ती वेतनाचे सुत्र, सेवानिवृत्ती उपदान, पीएच.डी. वेतनवाढी, कुंठित वेतनवाढी, वैद्यकीय भत्ता इत्यादी, याची ठळक उदाहरणे आहेत. असे प्रश्न बहुदा सामुहिक असतात. आणि निवृत्ती नंतर वयोपरत्वे एकेकट्याला शासन दरबारी दाद मागायला मर्यादा पडतात किंबहुना शक्य होत नाही. त्यासाठी संघटित प्रयत्नाची आवश्यकता असते आणि म्हणुन संघटीत झालेच पाहिजे.

संघटना स्थापन करताना केवळ आर्थिक प्रश्न व लाभ यांचाच विचार केलेला नाही. तर आपल्या शहरात सेवानिवृत्तांनी या निमित्ताने एकत्र यावे, एक दुसऱ्याच्या सुख दुःखात सहभागी व्हावे, एकमेकांना मदत करण्यासाठी पोषक वातावरण तयार करावे, एकत्र जमुन देशासमोरील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात वेळोवेळी उदभवणाऱ्या तत्कालीन प्रश्नावर विचार विनीमय करणे, या बाबी आम्हाला अधिक महत्वाच्या वाटतात.

## २ संघटनेचे स्वरूप

संघटनेचे कार्यक्षेत्र संपुर्ण महाराष्ट्र राज्य असुन सोसायटीज अॅक्ट व ट्रस्ट अॅक्ट नुसार नोंदणी झालेली आहे.

केंद्रीय कार्यालय औरंगाबाद येथे असुन मुंबई विभाग वगळता सभासदांच्या सोईसाठी राज्यभरात विद्यापीठ निहाय कार्यकारिणी स्थापन केल्या आहेत.

'ऑल इंडिया फेडरेशन ऑफ रिटायर्ड युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स असोसियशन हैद्राबाद' या देश पातळीवरच्या संघनेचे आपण सभासद आहोत.

सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या न्याय्य प्रश्नासाठी आंदोलन करणे, मोर्चे काढणे, निदर्शने करणे हा आपला मार्ग नाही. आणि ते आपणास शक्य नाही.

सनदशीर मार्गाने प्रश्न सोडविण्यासाठी शासनाकडे विविध स्तरावर पाठपुरावा करणे आणि जर सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही तर न्याय देवतेला साकडे घालणे ही संघटनेची कार्यपध्दती आहे.

सेवेत असताना ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केल्या प्रमाणे वेतन मिळत होते असे महाराष्ट्रातील सेवानिवृत्त 'शिक्षक' च संघटनेचे सभासद होण्यास पात्र आहेत.

सभासद होण्यासाठी संघटनेचा विहीत नमुन्यातील अर्ज आणि सभासद फी म्हणुन सोबत संघटनेच्या नावे रू.२000 धनादेश/धनाकर्ष पाठविणे अनिवार्य

संघटनेतील पद अथवा व्यक्तीच्या नांवे आलेले धनादेश अथवा सभासद फी, लढानिधी किंवा देणगी 'रोखीने' स्विकारल्या जात नाही.

असोशियेशनच्या घटनेप्रमाणे सदस्यत्व स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार कैंद्रीय कार्यकारिणीचा आहे.

आपण ज्या विद्यापीठ क्षेत्रातुन निवृत्त झाला आहात त्या विभागाकडे आपले संपुर्ण रेकॉर्ड ठेवण्याचे दायित्व असल्यामुळे आपला अर्ज 'त्या' विभागामार्फतच पाठवावा.

संघटनेच्या जमा खर्चाचे 'ऑडीट' सनदी लेखापाल कडून दर वर्षी केल्या जाते.

## ३ उद्दिष्टचे

"Not For me, but for my Community" हे संघटनेचे ब्रीद आहे. संघटनेच्या ध्येय धोरणानुसार पुढील उद्दिष्टचे निश्चित केली आहेत.

सभासदांचे सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक हित जोपासणे, संवर्धन करणे. सभासदांच्या न्याय्य प्रश्नासंबंधी जागृती निर्माण करण्यासाठी राज्यभर बैठका आयोजित करणे.

सभासदांच्या प्रश्नासाठी सनदशीर मार्गाने लढा देण्यासाठी निधी उभा करणे.

सेवा निवृत्ताच्या प्रश्नावर काम करीत असलेल्या अन्य संघटनेच्या भुमिकेवर अनावश्यक टीका करायचे टाळणे.

सेवानिवृत्तांच्या प्रश्नावर विधायक कार्य करीत असलेल्या अन्य संघटनेला आवश्यक असल्यास पाठिंबा देणे अथवा घेणे.

सभासदासाठी विभागीय स्तरावर स्व खर्चाने आरोग्य शिबीरे व व्याख्याने आयोजित करणे. तसेच सामाजिक बांधिलकी व ऋण मान्य करून शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात सेवा देणे.

## ४ संघटनेची वाटचाल

२००९ साली संघटना स्थापन करताना सदस्य संख्या फक्त ११ होती आज २२०० पेक्षा अधिक असून आणि त्यात निरंतर वाढ होत आहे.

सेवानिवृत्त सभासदात आज ६ कुलगुरू २ उच्च शिक्षण संचालक ८ उच्च शिक्षण सह संचालक १२५ च्या वर प्राचार्य आणि उर्वरित प्राध्यापक, ग्रंथपाल आणि फिजीकल डायरेक्टर आहेत.

शेवटच्या सभासदापर्यंत पोचण्यासाठी केंद्रीय कार्यकारिणी वर्षातुन किमान एक बैठक प्रत्येक विद्यापीठ विभागात आयोजित करते.

राज्यातील ८ विभागीय कार्यकारिणीचे पदाधिकारी ज्या त्या विभागाचे प्रश्न सोडविण्यासाठी वर्षभर आपल्या विभागातील सभासदांच्या संपर्कात असतात.

देशभरात १७ डिसेंबर हा दिवस 'पेन्शनर्स डे' म्हणुन साजरा केल्या जातो, हे औचित्य साधुन सर्व साधारणसभा याच दरम्यान आयोजित केल्या जाते.

संघटनेच्या जमा खर्चाचा ऑडीट रिपोर्ट व सर्व विभागीय कार्यकारिणी वर्षभरातील आपल्या कामाचा अहवाल या सर्वसाधारण सभेस सादर करतात.

रोटेशननुसार आजपर्यंत औरंगाबाद, जळगांव, नाशिक, कोल्हापूर, आणि नांदेड या शहरात वार्षिक सर्व साधारण सभा संपन्न झाल्या आहेत.

संघटनेने आता पर्यंत उच्च व सर्वोच्च न्यायालयात कुंठित वेतन वाढी, पीएच.डी च्या २ आणि ३ वेतन वाढी, सेवा निवृत्ती उपदान ५ ऐवजी ७ लाख रूपये या याचिका जिंकल्या असुन ३५०० पेक्षा जास्त सभासदांना योग्य तो आर्थिक लाभ मिळवून दिला आहे.

६ व्या वेतन आयोगात फेब्रुवारी २००९ पुर्वीच्या सेवा निवृत्तांना शेवटच्या महिन्याच्या ५० टक्के निवृत्ती वेतन आणि ४ थ्या व ५ व्या आयोगातील निवृत्तांना ६ व्या आयोगातील समकक्ष वेतनाच्या किमान पातळीवर वेतन निश्चिती करून त्याच्या ५० टक्के निवृत्ती वेतनासाठी दाखल केलेल्या याचिका सध्या न्याय्य प्रविष्ट आहेत.

न्यायालयाच्या अनुकूल निकालाच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी अवमान याचिका दाखल करून कार्यवाही करण्यास आपण शासनास भाग पाडले आहे.

डिसेंबर २०१३ पूर्वीच्या सभासदांच्या विधवा पत्निंना मोफत कायदेशीर मदत संघटना करीत आहे.

संघटनेच्या कामकाजाची, न्यायालयीन प्रकरणाची, व शासकीय आदेशाची माहिती acusat.org.in या संघटनेच्या वेबसाईटवर उपलब्ध होईल.

मित्रांनो आपल्या न्याय्य हक्कासाठी संघटित होणे ही काळाजी गरज आहे. कारण संघटन म्हणजे शक्ती आणि शक्ती म्हणजेच विजय! आपल्या न्याय्य हक्कासाठी संघटीत होवू या आणि संघर्ष करू या!!